# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १९४ वा शुक्रवार दि.१७ जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







# एप्रिलमध्ये होणार मनपा, जि. प. च्या निवडणुका?

मुंबई : प्रतिनिधी-लोकसभा, विधानसभा निवडणुकांनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध कार्यकर्ते व राजकीय पक्षाच्या प्रमुखांना लागले आहेत. आता सर्वच राजकीय पक्षांनी स्थानिक स्वराज्य पक्षांच्या निवडणुकांची तयारी सुरू केली आहे. दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. २२ जानेवारी रोजी ही सुनावणी होत असून अंतिम सुनावणी व्हावी, यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांगितले आहे. त्यामुळे एप्रिल महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्यात जवळपास २९ महागनरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषद आणि २८९ पंचायत समित्यांवर सध्या प्रशासक काम करत असून गेल्या २ वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून प्रशासक नेमण्यात आल्याने स्थानिक नेत्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. मात्र, आता लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना राज्य पातळीवर वेग आला असून लवकरच राज्य निवडणूक आयुक्त यासंबंधी घोषणा करू शकतात.

सध्या आरक्षणाच्या मुद्यावरून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा विषय सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. मात्र, याच महिन्यात या प्रकरणी सुनावणी होणार आहे. त्यातच ही सुनावणी अंतिम व्हावी, यासाठी राज्य सरकारकडून प्रयत्न केले जातील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते. त्यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना आता वेग आल्याचे दिसून आले. साधारणत: एप्रिल महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यासाठीच राज्य निवडणूक आयुक्तांच्या नावाची शिफारस केली जाणार आहे.

महायुतीच्या नेत्यांचा आत्मविश्वास वाढला

विधानसभा निवडणुकांच्या विजयी जल्लोषानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकांचा विजयी गुलाल उधळण्याची तयारी राजकीय पक्षांकडून सुरू होईल. दरम्यान, विधानसभा निवडणुकीत महायुतीला दैदिप्यमान यश मिळाल्याने महायुतीच्या नेत्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.



छत्रपती संभाजीनगर विभागाचे राज्य लोकसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी लातूर शहर महानगरपालिका लातूर येथे भेट दिली यावेळी लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी लोकसेवा हक्क अधिनियम २०15 सनद दाखविण्यात आले. यावेळी कांचन तावडे उपायुक्त, शेख खदीर सहाय्यक आयुक्त , नंदकिशोर तापडिया, रमाकांत पिडगे, शेख कलीम प्रमुख स्वच्छता निरीक्षक, बालाजी शिंदे भांडारपाल, रुक्मानंद वडगावे रमाई, पंतप्रधान आवास प्रमुख आधी अधिकारी उपस्थित होते.

## होमबेस्ड केअर गिव्हर कर्मचाऱ्यांना इस्त्राईलमध्ये नोकरीची संधी

लातूर, दि. १६ : इस्त्राईलमध्ये नोकरीच्या संधींसाठी कुशल होमबेस्ड केअर गिव्हर कर्मचाऱ्यांकडून अर्ज मागविण्याची कार्यवाही कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागाकडून सुरू झाली आहे. इस्त्राईल मधील (नॉन वॉर झोन) सुरक्षित वातावरणात आणि चांगल्या वातावरणात काम मिळावे यासाठी शासन सर्वोतपरी प्रयत्न करणार आहे.भारत सरकारच्या नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एनएसडीसी) इंटरनॅशनल आणि महाराष्ट्र सरकारच्या सहकार्याने होमबेस्ड केअर गिव्हर कर्मचाऱ्यांना इस्त्राईलमध्ये काम करण्याची संधी मिळत आहे. शासनाकडून सर्वोतपरी या होमबेस्ड केअर गिव्हर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. जिल्हा स्तरावर जिल्हा कौशल्य, रोजगार, उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे इच्छुकांनी संपर्क साधावा.ए.एन.एम.,जी.एन.एम.,बी.एस्सी.नर्सींग, पोस्ट नर्सिंग व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणाऱ्या उमेदवारांकडून होमबेस्ड केअर गिव्हर पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. निवडलेल्या व्यक्तींना इस्त्राईलमधील (नॉन वॉर झोन) सुरक्षित वातावरणात आणि चांगल्या वातावरणात काम मिळावे, यासाठी शासन सर्वोतपरी प्रयत्न करणार आहे. या नोकरीमुळे प्रत्येक कर्मचाऱ्यांना १लाख ३१ हजारापर्यंत दरमहा वेतन मिळेल. या पदासाठी २५ ते ४५ वर्षे वयोगटातील अर्जदार अर्ज करू शकतात. कर्मचाऱ्यांना किमान दोन वर्षांच्या नोकरीसाठी अनिवार्य करारावर स्वाक्षरी करावी लागेल. त्याचप्रमाणे इस्त्राईलमध्ये पूर्वीचा रोजगाराचा इतिहास नसावा. अर्जदार किंवा त्यांच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने यापूर्वी इस्त्राईलमध्ये काम केलेले नसावे.या नोकरीसाठी उमेदवारांने जवळपास १,४२,८८५ रुपये विमान तिकीट खर्च करणे अपेक्षित आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या दूरध्वनी क्रमांक ०२३८२-२९९४६२ व नोंदणीसाठी हीींिि://रहरीरिहीींरळपींशीपरींळेपरश्र.लो/क्षेलउश्रींरळश्र.रीु या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त बा.सु.मरे यांनी केले आहे.

## भटक्या विमुक्तांच्या पालावर जावून शासकीय सेवांचा लाभ देणे संवेदनशील प्रशासनाचे उदाहरण !

लातूर :- जिल्हा प्रशासनामार्फत भटक्या विमुक्तांना त्यांच्या पालावर जावून विविध शासकीय सेवांच्या लाभ देण्यात आला आहे. हा अपक्रम म्हणजे संवेदनशील प्रशासनाचे उत्तम उदाहरण असल्याचे नमूद करून छत्रपती संभाजीनगर विभागाचे राज्य लोकसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या पुढाकाराने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. जिल्हा प्रशासनाच्यावतीने ५५ शिबिरांचे आयोजन करून भटक्या विमुक्तांना विविध सेवांचा लाभ देण्यात आला आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या विविध सेवांच्या अंमलबजावणीची आढावा बैठक डॉ. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात झाली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकारी सागर खर्डे यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.





नागरिकांना शासनाच्या विविध सेवा, योजनांचा लाभ विहीत कालावधीत उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम तयार करण्यात आला. यानुसार राज्य शासनाच्या ६६२ सेवा अधिसूचित करून त्या ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच त्यांची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये ग्रामपंचायत पातळीपासून ते जिल्हास्तरीय कार्यालयाशी संबंधित सेवांचा समावेश असून या सर्व सेवांसाठी नागरिकांना ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा आहे. या अर्जावर निर्णय घेण्यासाठी पदसिद्ध अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. या पदसिद्ध अधिकाऱ्यांनी आपल्याकडे ऑनलाईन स्वरूपात प्राप्त होणाऱ्या सर्व तक्रारींचा निपटारा विहीत कालावधीत करावा, अशा सूचना डॉ. जाधव यांनी यावेळी दिल्या. अधिसूचित करण्यात आलेल्या काही सेवांमध्ये एकापेक्षा जास्त विभागांशी संबंधित काही सेवांचा समावेश आहे. अशा सेवांसाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर परस्पर समन्वयाने विहित कालावधीत असे अर्ज निकाली काढावेत. यासोबतच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या स्तरावर प्राप्त होणाऱ्या अपिलांचा निपटारा गतीने करावा. आपले सरकार सेवा केंद्रांमधून विविध सेवांसाठी अर्ज करता येतो, त्याचप्रमाणे अपीलही करता येतात. याबाबतचा फलक प्रत्येक आपले सरकार सेवा केंद्रामध्ये लावावा. तसेच आपले सरकार सेवा केंद्रामध्ये तक्रार पेटी लावून त्याची जबाबदारी संबंधित तलाठी यांच्याकडे द्यावी. या माध्यमातून प्राप्त तक्रारींचा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दरमहा आढावा घ्यावा, असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

विमुक्त जाती आणि भटक्या जमातीमधील व्यक्तींसाठी ५५ शिबिरे

विमुक्त जाती आणि भटक्या जमातींसाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्ह्यात विविध ठिकाणी ५५ विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत भटक्या विमुक्तांच्या पालावर जावून त्यांना आधारकार्ड, रहिवास दाखला, जातीचे प्रमाणपत्र, आयुष्मान भारत कार्ड, मनरेगा जॉब कार्ड आदी शासकीय कागदपत्रे व सेवांचा लाभ देण्यात आल्याचे अपर जिल्हाधिकारी श्रीमती टकले यांनी आपल्या प्रास्तविकात सांगितले. प्रारंभी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते भारतीय संविधानाची प्रत देवून राज्य लोकसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांचे स्वागत करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील हिरकणी कक्षाचीही डॉ. जाधव यांनी पाहणी केली. राज्य लोकसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात ५ व्यक्तींना शासकीय प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यामध्ये वैशाली सिरसीकर यांना उत्पन्न दाखला, सुनील ओव्हळ यांना उत्पन्न व रहिवासी दाखला, प्रशांत गायकवाड आणि विधान मस्के यांना जात प्रमाणपत्र, शंकर चळवाड यांना ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले.

## रेणापूर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस आ. कराड यांच्या प्रयत्नातून मुर्गाप्पा खुमसे यांचे नाव





लातूर : - मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यातील लढवये स्वातंत्र्य सेनानी रेणापूरचे भूमिपुत्र मुर्गाप्पा खुमसे यांचे सत्याग्रह, त्याग, कष्ट आणि कार्य अनेकांना प्रेरणादायी असून भावी पिढीला स्फूर्ती मिळावी यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नामुळे स्व. खुमसे यांचे नाव रेणापूर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस देण्याचा निर्णय राज्यातील महायुती शासनाने नुकताच घेतला आहे.

युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देवून त्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी सक्षम बनविणे व खाजगी औद्योगिक आस्थापनांना लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करण्याच्या उद्देशाने शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमार्फत (आयटीआय) प्रशिक्षण देण्यात येते. या प्रशिक्षण संस्थांच्या नावात ८ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार नेमण्यात आलेल्या एकसदस्यीय समिती त्या जिल्हयाचे पालकमंत्री यांच्याशी विचारविनिमय करुन नावात बदल करणेबाबत निर्णय घेण्यात घेण्यात आला. त्या अनुषंगाने १३२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची नावे बदलण्याबाबत बाब शासनाच्या विचाराधीन होती.

भाजपाचे नेते लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आ. रमेशआप्पा कराड यांनी शेतकरी, शेतमजूर, दिन दुबळे आणि मागास घटकासाठी सातत्याने लढा उभारणारे, निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध आवाज उठवणारे, मराठवाडा मुक्ती संग्राम लढायातील लढवये ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी स्व. मुर्गाप्पा खुमसे यांचे कार्य, सत्याग्रह प्रेरणादायी असल्याने भावी पिढीला स्फूर्ती मिळावी यासाठी रेणापूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस रेणापूर येथील स्वातंत्र्य सैनिक स्वर्गीय मुर्गाप्पा खुमसे यांचे नाव देण्यात यावे याकरिता संबंधितांकडे पाठपुरावा केला. आ. कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यानुसार रेणापूर सह राज्यातील १३२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचे नांव बदलण्यास महायुती शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत १५ जानेवारी २०२५ रोजी च्या शासन निर्णयानुसार मान्यता दिली आहे.

रेणापूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस मुर्गाप्पा खुमसे यांचे नाव देण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे रेणापूर येथील स्वातंत्र्य सैनिक कल्याण मंडळाचे उपाध्यक्ष सोमनाथ रोडे, सचिव के. ई. हरिदास, प्रा. भारत संपत्ते यांच्यासह भाजपाचे नवनाथ भोसले, अनिल भिसे, महेंद्र गोडभरले, दशरथ सरवदे, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, अनंत चव्हाण, सतीश आंबेकर, वसंत करमोडे, बाबासाहेब घुले, चंद्रकांत कातळे, शरद दरेकर, अच्युत कातळे, विजय चव्हाण, श्रीकृष्ण मोठेगावकर, दत्ता सरवदे, सुधीर तोडकरी, उत्तम चव्हाण, महेश गाडे, मनोज कराड, अमर चव्हाण, संतोष राठोड, जयप्रकाश हलकुडे, श्रीकृष्ण जाधव, सुकेश भंडारे, माऊली भिसे, शेख अजीम, राजकुमार आलापुरे, सिद्धेश्वर मामडगे, नामदेव बोबडे, राजू रायवाडे, श्रीकृष्ण पवार, लक्ष्मण यादव, नरसिंग येलगटे, रमाकांत फुलारी, निवृत्ती चिद्रे, गणेश माळेगावकर तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकाच्या परिवारातील सदस्य आणि भाजपाच्या लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते आभार व्यक्त केले आहेत.

## सांदीपनी टेक्निकल कॅम्पसच्या १०६ विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखतीत निवड




लातूर : लातूर - नांदेड महामार्गावरील कोळपा येथील सांदीपनी टेक्निकल कॅम्पस फॅकल्टी ऑफ इंजिनीअरिंग आणि पॉलिटेक्निकच्या १०६ विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखतीत निवड झाली आहे.

या कॅम्पस मुलाखतीसाठी जागतिक पातळीवरील झेप्टो, इपिटोम कॉम्पोनन्ट्स , बजाज ऑटो, वरॉक इंजिनीअरिंग, स्कॅफ्लेर इंडिया लि ., जर्मन कंपनीसारख्या नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मागच्या १५ दिवसात या सर्व कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखतीत सांदीपनी टेक्निकल कॅम्पसच्या एकूण १०६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. आगामी काळात अनेक कंपन्या कॅम्पस प्लेसमेंटसाठी येणार आहेत. महाविद्यालय व्यवस्थापन, प्राचार्य, उपप्राचार्य, प्रशिक्षण आणि प्लेसमेंट अधिकारी त्यांच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी शंभर टक्के प्लेसमेंटसाठी नियोजन करत आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, उपाध्यक्ष डॉ. अनिल राठी, प्राचार्य डॉ.संजीवनी कुलकर्णी मॅडम, डॉ.उद्धव बडगिरे, प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी सुनील खंडेलवाल यांसह सर्व विभाग प्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## संपादकीय....

# व्यवहारात गाढवांचे महत्त्व

कोणी एके काळी इयत्ता पाचवीला पहिल्यांदा इंग्लिश म्हणजेच एबीसीडी शिकवले जायचे. सर्वत्र पाहायला मिळत असल्यामुळे 'डी फॉर डाँकी' म्हणजेच गाढव अशी गाढवाची पहिल्यांदा ओळख व्हायची. गाढवांची संख्या कमी होत गेल्यामुळे आणि ती दृष्टीस पडणे दुर्मीळ झाल्यामुळे आजकाल 'डी फॉर डॉग' असे शिकवले जाते. महाराष्ट्रात गाढवांना फार मोठे मोल आहे असे आम्ही तुम्हाला सांगितले, तर तुम्ही आश्चर्यचकित व्हाल, यात शंका नाही. अर्थात, आपण या ठिकाणी समाजातील गाढव प्रवृत्तीच्या लोकांची चर्चा करत नसून प्रत्यक्ष गाढव या प्राण्याविषयी चर्चा करत आहोत हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. तसेही महाराष्ट्राच्या एकंदरीत व्यवहारात गाढवांचे महत्त्व आहेच.

पौष पौर्णिमेनिमित्त जेजुरी येथे गाढवांचा बाजार भरत असतो. पंचवीस हजार रुपयांपासून ते एक लाखापर्यंत अशी साधारणतः गाढवांची किंमत असते. जेजुरीत व्यापारी आणि विक्रेते या बाजारात येत असतात आणि या ठिकाणी गुजरातमधून आलेल्या काठेवाडी गाढवांची विक्री मोठ्या प्रमाणात होते. तीन ते चार दिवस हा बाजार भरत असतो. भटक्या जाती-जमातीचे बांधव या निमित्ताने जेजुरीत येत असतात. एकंदरीत दरवर्षी या बाजारात एक कोटीची उलाढाल होते. यावरून देशात आजही गाढवांचा मान ठेवला जातो, असे आपल्या लक्षात येईल. दणकट आणि मजबूत शरीरयष्टीच्या गाढवांना ७० ते ८० हजार रुपयांपर्यंत भाव मिळतो. तुम्हास असा प्रश्न पडेल की, शहरात सहसा नजरेला न पडणार्‍या गाढवांना इतकी डिमांड कशी काय आहे? गाढव हा अत्यंत धीरोदात्त आणि संयमी प्राणी आहे. त्याच्या पाठीवर कितीही ओझे लादले, तरी तो तक्रार करत नाही आणि अजिबात आवाज न करता नेमून दिलेले काम पूर्ण करत असतो. सध्या गाढवांचा वापर रेती वाहून नेण्यासाठी जास्त प्रमाणात केला जातो.

वाळूचे खनन होत असताना अनेक यंत्रणा अवैध वाळू उपशावर लक्ष ठेवून असतात. ट्रक, ट्रॅक्टर इत्यादी वाहने त्या ठिकाणी गेल्यास त्यांचा आवाज होतो. यासाठी गाढवांना प्राधान्य देण्यात येते. गाढवाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते विनाकारण कधी आवाज करत नाही. त्याच्या पाठीवर वाळू आणि रेती पोत्यामध्ये लादून टाकली की ते नीट सांगितलेल्या जागेवर आवाज न करता ते पोते घेऊन जाते. कौतुक म्हणून ना कोणी त्याच्या गळ्यात घंटा बांधते, ना ते स्वतः बिचारे कोणता आवाज करते. कुरकूर न करता काम करणार्‍या गाढवाला भावी काळामध्ये भरपूर डिमांड येण्याची शक्यता आहे.

नांदेड जिल्ह्यात एक गर्दभ अभयारण्य आहे. या ठिकाणी आजारी गाढवांवर उपचार केले जातात, तसेच त्यांना भरपूर चारा व पाणी उपलब्ध करून दिले जाते. दुर्गम अशा ठिकाणी डोंगरदर्‍यांमध्ये जिथे वाहन जाऊ शकत नाही अशा अडचणीच्या ठिकाणी सिमेंट, वाळू, मुरुम आणि अन्य अवजड सामान वाहून नेण्यासाठी गाढवांची गरज असते. प्रामुख्याने वीट भट्टी, बांधकाम आणि रेती उपसा या कामासाठी अजूनही गाढवांचा वापर ग्रामीण भागात केला जातो. वैदू, कैकाडी, कोल्हाटी, कुंभार माती वडार, मदारी, डोंबारी, गारुडी आदी समाज बांधव गाढव खरेदीसाठी जेजुरीत दरवर्षी येत असतात. एकावेळी ५० ते ६० किलोचा बोजा वाहून नेण्याची गाढवाची क्षमता असते. त्यामुळे गाढवांना भरपूर किंमत मिळते.

# ध्येयाच्या मागावर

यूपीएससी सिव्हिल सर्व्हिससेच्या परीक्षेची अधिसूचना जाहीर झालेली आहे. सनदी नोकरशहा बनण्याचे स्वप्न बघणारे लाखो उमेदवार येत्या २५ मे २०२५ रोजी पूर्व परीक्षा देतील. संघ लोकसेवा आयोगाची सलग दोन वर्षे घेतली जाणारी यूपीएससी अर्थात आयएएस, आयएफएस, आयपीएसची परीक्षा भारतातील सर्वांत अवघड परीक्षा समजली जाते. दरवर्षी १३ ते १३.५० लाख विद्यार्थी या परीक्षेला बसतात. त्यापैकी २५ टक्के उमेदवार चाळणी म्हणजेच पूर्व परीक्षा पास करतात. त्यातील १५ टक्के मुख्य परीक्षेपर्यंत पोहोचतात; मात्र तेथे वस्त्रगाळ झालेले फक्त ०.२ टक्केच उमेदवार ही परीक्षा क्रॅक करू शकतात. यात महाराष्ट्रातील तरुण पाव टक्काही नाहीत, असे का?

आयएएस परीक्षेत नेहमीच उत्तर भारतीय आणि दक्षिण भारतीयांचा वरचष्मा असतो. त्या तुलनेत मराठी तरुण स्पर्धा परीक्षेत मागे पडतात, अशी टीका केली जाते. ही काही अंशी योग्य असली, तरी मराठी तरुणांच्या 'मागे पडण्या'मागची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला जात नाही. एखाद्याने तसा प्रयत्न केलाही तरी या तरुणांमध्ये जोश निर्माण करण्यासाठी हव्या असणार्‍या वातावरण निर्मितीसाठी पुढाकार घेतला जात नाही. महाराष्ट्रातील मुले तशी कणखर, ताकदवान आणि पक्क्या हाडाची. साहस हा इथल्या मातीचा गुणधर्म.




प्रतिकूल स्थितीत आव्हान पेलण्याची त्यांच्यात क्षमता आहे. ज्यांना या क्षमतेचा पुरेपूर वापर करता येतो, ते तरुण-तरुणी कोणत्याही संकटांना, अडथळ्यांना न जुमानता यशाची शिखरे पादाक्रांत करतात. प्रतिकूल परिस्थिती त्यांच्या जबर इच्छाशक्तीला लगाम घालू शकत नाही. अडचणींचे डोंगर फोडण्याची ताकद त्यांच्या मनगटात असते. संकटाचे पर्वत सर करण्याचे त्यांना वेड असते. या वेडाने झपाटून प्रसंगी ते सात समुद्र पार करून विदेशात डंका वाजवतात. याचे एकमेव कारण म्हणजे, जबर इच्छाशक्ती आणि अदम्य साहस; परंतु ज्यांना हे साध्य होत नाही, ते बुद्धीने कमी किंवा मैदान सोडून पळ काढणारे असतात, असा त्याचा अर्थ नाही. यशाचे शिखर गाठताना मध्येच ते जमिनीवर आदळतात, अपयशी होतात. मोठा पराक्रम गाजविण्यासाठी कराव्या लागणार्‍या तयारीत ते कुठेतरी कमी पडतात. कधी आर्थिक अडचण त्यांच्या यशात अडथळा बनते, तर कधी पुरेसे मार्गदर्शन आणि कोचिंगअभावी त्यांच्या तोंडचा घास हिरावला जातो. आयएएस, आयपीएस, आयएफएस आणि वैमानिक पदाचा घास तोंडापर्यंत येत असताना तो मध्येच सोडून देण्याचे दुर्दैव या तरुणांच्या यशाआड आल्याची अनेक उदाहरणे आहेत.

तथापि, नियमित अभ्यास, चौफेर वाचन, दररोज आपल्या अवतीभवती घडणार्‍या घडामोडींची इत्यंभूत माहिती, देश-विदेशातील ज्वलंत घडामोडींवर लक्ष आणि त्याबाबत विश्लेषण करण्याची आपली तयारी असेल, तर कोणत्याही विद्या शाखेचा पदवीधर संघ लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेला बसून आयएएस, आयपीएस अथवा आयएफएस बनू शकतो. त्यासाठी पदवी परीक्षेत फर्स्ट क्लास येण्याचीही अट नाही. साधा पास क्लास असलेला कोणताही विद्यार्थी, विद्यार्थिनी ही परीक्षा देऊ शकते. कारण, गुणवत्ता यादीत येऊन पदवीधर होणे हा काही बुद्धिमत्तेचा अंतिम पुरावा नाही.

सनदी नोकरशहा बनण्यासाठी हवी असते जबर इच्छाशक्ती! ही जबर इच्छाशक्ती झेपावणार्‍या पंखांत संचारते. झेपावणार्‍या पंखांना क्षितिज नसते. क्षितिजाला अंत नसतो. ते अथांग असते, अमर्याद असते. म्हणून एखाद्याने अशा क्षितिजात घ्यायची असेल तर गरुडझेप घ्यावी. कारण, क्षितिजाच्या या पोकळीत किलबिलाट करणार्‍या पक्षांना थारा नसतो. कुठलीही गोष्ट अर्धवट सोडून द्यायची नसते. तिच्यात सातत्य हवे असते. हे सातत्य टिकवून ठेवण्यासाठी ध्येयाच्या मागावर असावे

# फिरण्यासाठी आता निवडा लुईझियाना, सगळ्या कुटुंबाला आनंद घेता येतील अशा मार्डी ग्रास फेस्टिव्हिटीज

अनेकांना जगभर फिरायला आवडते. पण त्याच त्याच ठिकाणांपेक्षा काहीतरी वेगळी ठिकाणं हवी असतील तर फ्रान्समधील लुईझियाना तुमच्यासाठी नक्कीच उत्तम ठरेल. जाणून घ्या माहिती आणि यावर्षी सुट्टीचा आनंद

लुईझियानाचे मार्डी ग्रास सेलिब्रेशन जगभरात त्यातून दिसून येणारी संस्कृती व परंपरेसाठी, बहारदार कार्यक्रम, कार्निव्हल, पोशाख, थीमनुसार खाद्यपदार्थ आणि अशा विविध गोष्टींसाठी प्रसिद्ध आहेत. फ्रान्समधील पारंपरिक 'बॉफ ग्रा' रिव्हेरीपासून सुरू झालेला मार्डी ग्रास पुढे वसाहतींमध्ये प्रचलित झाली आणि कालांतराने तिचे आज आपल्याला माहीत असलेल्या प्रसिद्ध फेस्टिव्हलमध्ये रुपांतर झाले. १६९९ मध्ये फ्रेंच- कनेडियन संशोधक जीन-बॅप्टिस्ट ले मोयने डी बिएनविले यांनी न्यू ऑलिन्सजवळील जमिनीच्या तुकड्याचे 'मार्डी ग्रास पॉइंट'मध्ये रुपांतर करत परिसरात या कार्यक्रमाची सुरुवात केली. १७३० मध्ये मार्डी ग्रास एलिगंट बॉल्स आणि मास्कर्स प्रोसेशन्ससह न्यू ऑलिन्सच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले.

कार्निव्हल सीझन १२ व्या रात्री ६ जानेवारी सुरू झाला आणि २०२५ मधील फेस्टिव्हिटीजची ४ मार्च म्हणजेच फॅट ट्युस्डे किंवा मार्डी ग्रास डे च्या निमित्ताने सांगता झाली. या काळात संपूर्ण राज्य एकत्र येऊन लुईझियानामधील वर्षातला सगळ्यात आनंददायी दिवस साजरा करतं. सगळे जण आपलं कुटुंब व मुलांसह वेगवेगळ्या उपक्रमांचा आनंद घेतं.

ग्रेटर न्यू ऑलिन्स परिसर

स्लाइडेल: न्यू ऑलिन्सच्या पूर्वेला काही मैल गेल्यानंतर जिथे क्रेवे ऑफ बिल्जची बोट परेड स्लाडेल कॅनलमधून जाते. कुटुंबांना सजवलेल्या बोट पाहाताना मजा येईल, जिथे क्रेवे सदस्य बीड्स आणि कार्निव्हल ट्रेझर्स टॉस करतात.

जेफरसन पॅरिशच्या कौटुंबिक अनुभूती देणाऱ्या मार्डी ग्रास अनुभव - फॅमिली ग्रासचा आनंद घ्या. हा मोफत कार्यक्रम सगळ्या कुटुंबाला आनंद देणारा असेल. मार्डी ग्रास परेड्सचा दिमाख, अस्सल स्थानिक खाद्यपदार्थ, स्थानिक कला, किड्स कोर्ट आणि आऊटडोअर राष्ट्रीय कलाकार आणि लुईझियानाच्या लाडक्या कलाकारांचे आउटडोअर कॉन्सर्ट्स यांचा तुम्हाला आनंद घेता येईल.

न्यू ऑलिन्स: फरी फ्रेंड्स अर्थात लाडक्या पाळीव प्राण्यांमुळे मार्डी ग्रासचा हा उत्सव आणखी रंगतदार होतो. न्यू ऑलिन्सचे फ्रेंच क्वार्टर वार्षिक बारकस क्रेवे इथे कुत्री आणि त्यांचे ओनर्स गोड, अतरंगी कपड्यांत सजून येतात. सर्व प्रकारच्या प्राणीप्रेमींसाठी हा कार्यक्रम पर्वणी असतो.

या देशाचे कायदे उत्तर कोरियापेक्षा कडक! ना फिरण्याचे स्वातंत्र्य ना फोटो काढता येत, इथे आहे नरकाचा दरवाजा

दक्षिण लुईझियाना

लाफायते: लाफायतेमधल्या मार्डी ग्रास फेस्टिव्हिटीज मोठ्या धामधुमीत साजऱ्या केल्या जातात. त्यातले दोन महत्त्वाचे कौटुंबिक सोहळे म्हणजे मुलांची वार्षिक परडे आणि क्रेवे ऑफ बोनापार्ट. मुलांची परडे डाउनटाउन लाफायतेमधून सुरू होईल आणि त्यानंतर संध्याकाळी क्रेवे ऑफ बोनापार्टचा दिमाखदार पद्धतीने प्रारंभ होईल. या फक्त परेड नाहीयेत. जुन्या पद्धतीचे कुरिर दी मार्डी ग्रास व्हर्मिलियनव्हिल येथे होईल आणि त्यानंतर बाकी ठिकाणी त्याचे आयोजन केले जाईल.

युनिस: युनिस, लुईझियाना हे लहान काजुन कंट्री टाउन्सपैकी एक आहे, जिथे संस्कृती आजही असोशीने जपण्यात आलेली आहे आणि कुटुंब हा त्या संस्कृतीचा महत्त्वाचा भाग आहे. म्हणूनच तुम्हाला इथे छोटी मार्डी ग्रास दिसेल, जिथे लहान मुलं वेगवेगळ्या वयोगटांत विभागली जातात आणि पारंपरिक कजुन मार्डी ग्रास परंपरांमध्ये भाग घेतात.

बॅटन रोद: बॅटन रोदमध्ये द मिस्टिक क्रेवे ऑफ मट्स हा धमाल विनोदी कार्यक्रम स्थानिक नॉन- प्रॉफिटद्वारे कुत्र्यांच्या नसबंदीसाठी निधी उभारणीसाठी आयोजित केला जातो. त्यामध्ये आकर्षक कपडे घातलेली कुत्र्याची पिल्लं डाउनटाउन बॅटन रोगमधून परेड करतात. इथे रूचकर खाद्यपदार्थही उपलब्ध असतात. तेव्हा भुकेले या.

लेक चार्ल्सः लेक चार्ल्समध्येही क्रेवे ऑफ बारकस परेड होते, ज्यात पाळीव प्राणी, त्यांचे मालक आणि ज्यांना यात सहभागी होऊन मार्डी ग्रासचा सर्वोत्तम अनुभव घ्यायचा आहे, त्यांना प्रोत्साहन दिलं जातं.

जीनरेटः ग्रँड माराएस मार्डी ग्रास परेडचा अनुभव सगळ्या कुटुंबाला आवडण्यासारखा आहे. हा ग्रामीण मार्डी ग्रास परेड काजुन कंट्रीमध्ये हायवे ९० कॉर्नर आणि जीनरेटच्या कॉलेज रोडवर घेतला जातो. या कौटुंबिक पद्धतीच्या कार्यक्रमात फ्लोट्स, बँड्स आणि 'अग्ली कॉश्च्युम' स्पर्धा घेतली जाते, जी चुकवू नये अशी आहे.

दक्षिण लुईझियानामधील होमा आणि थिबोडॉक्स अशी सगळी लहान शहरं अनुभवा, कारण प्रत्येक ठिकाणी कार्निव्हल सीझन साजरा करण्याच्या पद्धती वेगळ्या असतात.

मध्य लुईझियाना

अलेक्झांड्रियाः मुलांना खरी राणी पाहायला घेऊन जायचं आहे का? मिस टीन लुईझियाना ही अलेक्झांड्रियाच्या वार्षिक चिल्ड्रन परेडची ग्रँड मार्शल आहे. तुम्हाला इथं सगळंच्या सगळं कुटुंब अगदी आजी- आजोबा, नातवंडांपासून सगळे जण रंगीत फ्लोट्सपासून स्थानिक मार्चिंग बँड्स, नृत्यापर्यंत बरंच काही दिसेल आणि तुम्हाला त्याचा आनंद घेता येईल.

नॅचिटोचेसः सगळं कुटुंब नॅचिटोचेस इथं क्रेवे ऑफ डायोनिसॉसचा आनंद घेऊ शकतो. इथली संध्याकाळची परेड आकर्षक प्रकाशयोजना, पोशाख आणि घरी घेऊन जाता येणारे भरपूर बीड्स यांमुळे रंगतदार होते.

उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये बाहेर फिरण्याचा प्लॅन करत असाल तर कमी बजेटमधील 'या' सुंदर ठिकाणांना नक्की भेट द्या

उत्तर लुईझियाना

मनरोः मनरोमधली क्रेवे ऑफ जानुस परेड डझनभर फ्लोट्स आणि मार्चिंग बँड्ससह शो सादर करते. इथल्या मोठ्या फ्लोट्सवर भव्य स्कल्पचर्स आणि आकर्षक रंगांची उधळण असते, जी नेत्रसुखद असते. त्याचप्रमाणे क्रेवे ऑफ जानुस मुलांच्या परेडमध्येमध्ये धमाल कौटुंबिक उपक्रमांसह सर्वोत्तम फ्लोट्ससाठी स्पर्धा घेतली जाते. मुलांच्या परेडमध्ये तुम्हाला सजावट केलेली भरपूर वॅगन्स व वेगवेगळे कपडे परिधान केलेली मुलं दिसतील. श्रेव्हपोर्टः श्रेव्हपोर्ट क्रेवे ऑफ बारकस आणि मिऑक्स परेडमध्ये असतं. कुत्र्यांच्या पिल्लांची धमाल पाहायला या आणि तुमची पिल्लं घेऊन यायला विसरू नका.

ही गोड परेड तुम्हाला 'हॅपी मार्डी पॉ' म्हणायची प्रेरणा देईल.

# गृहमंत्रालयाची कारवाई योग्य दिशेने ;राज्यात वाल्मिक कराड सारखे हजारो गुन्हेगार असू शकतात!

संतोष देशमुखांचे ९ डिसेंबर २०२४ ला अपहरण झाले व नंतर त्यांची अमानुषपणे हत्या करण्यात आली व यानंतर चौकशीच्या माध्यमातून अनेक उलघडे सामोर आले.या कारवाई दरम्यान फरार आरोपींना पकडण्यात सुध्दा आले.यात वाल्मिक कराड सुध्दा फरार होता.परंतु वातावरण जास्तच चिघळत असल्याचे पाहून आपल्याला सपोर्टस करणारे राजकीय पुढारी फसु शकतात हे पाहून वाल्मिक कराड पोलिसांना शरण आला.त्यानंतर चौकशी दरम्यान पोलिस विभागाला सर्व आरोपी व वाल्मिक कराडपासुन नवीन-नवीन सुगावे लागत गेले.यावरून स्पष्ट झाले की वाल्मिक कराड सर्वसाधारण व्यक्ती नसून मोठा गुन्हेगार आहे.त्याच अनुषंगाने त्याच्यावर सीआयडीकडुन मकोका लावण्यात आला आहे. बीडच्या याप्रकरणाला एक महिन्यापेक्षा जास्त दिवस लोटुन गेले.तरीही तेथील संघर्ष अजूनही शांत झाला नाही.बीड मधील संतोष देशमुख हत्याप्रकरण संपूर्ण महाराष्ट्रासह देशात गाजत आहे.त्यामुळे बीडची परिस्थिती अतिसंवेदनशील आहे.यामुळे असे वाटत आहे की बीडमध्ये चाल्लय तरी काय! बीडच्या या हत्याकांडावरून असे लक्षात येते की याठीकाणी गुन्हेगारांना कोन्हीतरी मोठा नेता खत पाणी घालत असावेत तेव्हाच त्याठिकाणी एवढे मोठे गुन्हेगारांचे जाळे विणलेले दिसून येते. ही हत्या खंडणी प्रकरणातून झाली असल्याचे सांगितले जाते आणि संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सुत्रधाराची सुई वाल्मिक कराडवर जात आहे व आतापर्यंतच्या तपास यंत्रणेच्या माध्यमातून असे लक्षात येते की वाल्मिक कराड हा खंडणी वसूलीच्या बाबतीत मुख्य आरोपी असल्याचे दिसून येते.गुन्हा अन्वेषण विभाग (सीआयडी) यांनी सखोल चौकशी केली तेंव्हाच वाल्मिक कराडवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यान्वये (मकोका) चार आरोप ठेवण्यात आला.त्यामुळे संतोष देशमुख हत्येचा सूत्रधार मानण्यात येत असल्याने कराडच्या अडचणींत वाढ झाली आहे.त्यामुळे कराड समर्थक आंदोलन करतांना दिसत आहे.एकीकडे कराड समर्थक तर दुसरीकडे संतोष देशमुख हत्याप्रकरणाची चौकशी करण्याचे समर्थन करणारे अशा पध्दतीचे दोन गट निर्माण झाल्याने सरकारने बीड जिल्ह्यात २८ जानेवारीपर्यंत जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे.संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे जिल्हाभरात विविध संस्था, संघटना, राजकीय पक्ष यांच्याकडून आंदोलन करण्यात येत आहे तर दुसरीकडे कराडवर मकोका लावल्याने त्यांचे समर्थक आगबबुला झाल्याने आंदोलन करीत आहे.यात संघर्ष निर्माण होवू नये म्हणून सरकारने जमावबंदीचे आदेश दिले आहेत ही सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून महत्वपूर्ण बाब आहे.कारण सध्याच्या परिस्थितीत बीडमध्ये एकीकडे गुन्हेगारांचे समर्थक तर दुसरीकडे गुन्हेगारांचे विरोधक आमनेसामने आल्याचे दिसून येते.गुन्हेगार हा गुन्हेगारच असतो त्याला माफी नकोच. पोलिस विभाग, सीआयडी विभाग व अन्य सुरक्षा विभागाचे वाल्मिक कराड बाबद सखोल चौकशी केल्यानंतरच त्यावर मकोका लावण्यात आला आहे ही बाब वाल्मिक कराडच्या समर्थकांनी लक्षात ठेवली पाहिजे व चौकशी करीता सरकारला व सुरक्षा विभागाला सहकार्य केले पाहिजे.कारण गुन्ह्याला माफी नकोच.मकोका लावल्यानंतर बीड न्यायालयाकडुन वाल्मिक कराडला ७ दिवसांची एसआयटी कोठडी सुनावण्यात आली आहे.यात आणखी अनेक उलघडे सामोर येवू शकतात. कारण ९ डिसेंबरला सुदर्शन घुले, विष्णू चाटे आणि वाल्मिक कराड यांचे फोनवरून संभाषण झाल्याचे सांगितले जाते यात त्या दिवशी नेमके काय बोलने झाले याचा तपास एसआयटी मार्फत होणार आहे.यावरून स्पष्ट होते की वाल्मिक कराड सर्वसाधारण गुन्हेगार नसुन याचे गुन्हेगारीचे मोठे जाळे असल्याचे सिद्ध होते.शेवटी गुन्हेगार हा गुन्हेगारच असतो त्यामुळे सर्वांनीच पोलिस विभाग, सीआयडी विभाग व गृहविभागाला सहकार्य करने अत्यंत गरजेचे आहे.कारण बीडच्या या हत्याकांडाच्या प्रकरणावरून लक्षात येते की राज्यात हजारो वाल्मिक कराड राहु शकतात यालाही नाकारता येत नाही.त्यामुळे अशा गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी सर्वांनीच पोलिस विभागाला सहकार्य करण्याची नितांत गरज आहे.कारण बलात्कार,खंडणी वसुली, हत्या करणे, धमकी देणे,वाळू माफिया व अन्य माफिया असे मोठ-मोठे गुन्हेगार आपल्याला राज्यात दिसून येतात.परंतु या गुन्हेगारांना एखाद्या मोठ्या राजकीय पुढाऱ्यांचा सपोर्ट अवश्य असतो तेंव्हाच तो गुन्हेगार खुलेआम गुन्हा करतांना दिसतात.त्यामुळे सरकारने व गृहविभागाने गुन्हेगारांवर कारवाई तर करावीच सोबत पडद्याच्या मागे असणाऱ्या मोठ्या माश्यांवर सुध्दा कठोर कारवाई व्हायला हवी.जय हिंद!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## दालमखानी बनवताना चुका होतात? मग 'या' सोप्या पद्धतीचा वापर करून घरी बनवा चविष्ट दालमखानी



जेवणात नेहमी नेहमी तेच तेच पदार्थ खाऊन कंटाळा आल्यानंतर तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये दालमखानी बनवू शकता. दालमखानी हा पदार्थ घरातील सगळ्यांचं नक्की आवडेल. चला तर जाणून घेऊया दालमखानी बनवण्याची सोपी रेसिपी.

लहान मुलांसह मोठ्यांना दालमखानी हा पदार्थ खायला खूप आवडतो. नेहमी नेहमी जेवणात डाळ किंवा तिखट आमटी खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची इच्छा होते. अशावेळी अनेक घरांमध्ये दालमखानी हा पदार्थ बनवला जातो. मात्र दालमखानी बनवताना डाळीला रंग नीट येत नाही. तर अनेकदा डाळीची चव पूर्णपणे खराब लागते. हॉटेलमध्ये गेल्यानंतर भात किंवा चपातीसोबत खाण्यासाठी दालमखानी हा पदार्थ मागवला जातो. पण सतत बाहेरचे पदार्थ खाणे आरोग्यासाठी चांगले नाहीत. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये दालमखानी बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. या पद्धतीने दालमखानी बनवल्यास घरातील सर्वच तुमचे खूप कौतुक करतील आणि जेवणात चार घास जास्त जातील. चला तर जाणून घेऊया हॉटेल स्टाईल दालमखानी बनवण्याची सोपी रेसिपी.(फोटो सौजन्य - ळडींलज्ञ)

साहित्य:

उडीद डाळ
कांदा
टोमॅटो
लाल तिखट
हळद
मीठ
तेल
राजमा
चण्याची डाळ
तूप
पाणी
आलं लसूण पेस्ट
फ्रेश क्रीम
गरम मसाला

कृती:

दालमखानी बनवण्यासाठी सर्वप्रथम, सर्व डाळी स्वच्छ साफ करून रात्रभर पाण्यात भिजत ठेवा.

कुकरच्या भांड्यात भिजवलेल्या डाळी, राजमा टाकून त्यात पाणी टाका. नंतर वरून चवीनुसार मीठ टाकून कुकरच्या चार शिट्ट्या काढून घ्या.

कढईमध्ये तूप टाकून ते गरम झाल्यानंतर त्यात जिरं आणि आलं लसूण पेस्ट टाकून व्यवस्थित भाजा.

नंतर त्यात कांदा टोमॅटोची पेस्ट आणि चवीनुसार मीठ टाकून मिक्स करा. कांदा टोमॅटोच्या ग्रेव्हीला तेल सुटेपर्यंत भाजून घ्या.

नंतर त्यात लाल तिखट, हळद, गरम मसाला इत्यादी सर्व मसाले टाकून व्यवस्थित मिक्स करा.

मसाले भाजल्यानंतर त्यात मिक्स करून घेतलेली डाळ टाकून व्यवस्थित उकळी काढून घ्या.

वरून ताजी साय, फ्रेश क्रिम घालून ५ ते १० मिनिटं दालमखानी शिजवा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली दालमखानी. या पद्धतीने दालमखानी तुम्ही बनवू शकता.

# चष्मा घालत्यानंतरही स्पष्ट दिसत नाही? 'या' गंभीर आजारांमुळे वाढू शकतो मोतीबिंदूचा धोका, वेळीच घ्या काळजी

डोळ्यांमध्ये मोतीबिंदू झाल्यानंतर शरीरात अनेक गंभीर लक्षणे दिसू लागतात. त्यामुळे डोळ्यांच्या आरोग्याची जास्त काळजी घेणे आवश्यक आहे. हे आजार झाल्यानंतर मधुमेहाचा धोका वाढण्याची शक्यता असते.

हल्ली बदलेल्या जीवनशैलीचा परिणाम आरोग्यावर दिसून येतो, तसाच परिणाम डोळ्यांच्या आरोग्यावर सुद्धा दिसून येतो. कोरोनानंतर संपूर्ण जगभरात अनेक नवनवीन बदल झाले. या काळात ऑफिसची काम, शिक्षण इत्यादी गोष्टी पूर्णपणे डिजिटली करण्यात आल्या. मात्र याचा गंभीर परिणाम हळूहळू डोळ्यांच्या आरोग्यावर दिसून येत आहे. तासनतास एकजागेवर बसून ऑफिसची काम, कॉलेजमधील लेक्चर इत्यादी गोष्टींमुळे डोळ्यांचे आरोग्य बिघडले आहे. डोळ्यांसंबंधित अनेक गंभीर समस्या उद्भवू लागल्या आहेत. त्यामुळे डोळ्यांची काळजी घेण्यासाठी डोळ्यांना चष्मा लावले आवश्यक आहे. काम करताना किंवा बाहेर फिरताना चष्मा लावल्यामुळे डोळ्यांचे नुकसान होत नाही.(फोटो सौजन्य -



डोळ्यांसंबंधित उद्भवणारा गंभीर आजार म्हणजे मोतीबिंदू. मोतीबिंदू झाल्यानंतर डोळ्यांचे नुकसान होऊ लागते. तासनतास बसून मोबाईल किंवा टीव्ही पाहिल्यामुळे डोळ्यांचे आरोग्याचे गंभीर नुकसान होते. मोतीबिंदू झाल्यानंतर ऑप्टिक नर्व्हचे नुकसान होते. ही मज्ञातंतू डोळ्यांकडून मेंदूकडे संकेत पाठवते. जगभरात अनेक लोक मोतीबिंदू या डोळ्यांसंबंधित गंभीर आजारामुळे त्रस्त आहेत.हा आजार हळूहळू वाढू लागल्यानंतर काही दिवसांनी डोळ्यांच्या आरोग्यावर परिणाम करतो. त्यामुळे योग्य वेळी डोळ्यांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. आज आम्ही तुम्हाला कोणत्या आजारांमुळे मोतीबिंदू वाढण्याची शक्यता असते? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

उच्च रक्तदाब:

उच्च रक्तदाबाच्या समस्येने त्रस्त असलेल्या लोकांनी आरोग्याची योग्य ती काळजी घ्यावी. आरोग्याला हानी पोहोचवणाऱ्या गोष्टी करणे टाळावे. याशिवाय शरीरात उच्च रक्तदाब वाढल्यानंतर डोळ्यांच्या रक्तवाहिन्यांवर ताण येण्याची शक्यता असते. तसेच ऑप्टिक मज्ञातंतूचे पोषण करणाऱ्या रक्तवाहिन्यांचे नुकसान होऊ शकते. यामुळे मोतीबिंदू होण्याची शक्यता असते. त्यामुळे शरीरात वाढलेला रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य ते औषध उपचार करावे.

मायग्रेन:

काहींना सतत डोकेदुखणे किंवा मायग्रेनची समस्या जाणवू लागते. मायग्रेनचा त्रास असलेल्या व्यक्तींना काचबिंदू होण्याची शक्यता असते. त्यामुळे मायग्रेनची समस्या उद्भवू लागल्यास तातडीने डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य ते औषध उपचार करावे. मायग्रेनचा त्रास असलेल्या व्यक्तींचे ऑप्टिक नर्व्हमध्ये रक्त प्रवाह कमी होऊन इतर गंभीर समस्या उद्भवण्याची शक्यता असते.

मायोपिया:

उच्च मायोपिया झाल्यानंतर डोळ्याचा आकार बदलतो, ज्यामुळे डोळयातील पडदा आणि ऑप्टिक मज्ञातंतू मोठ्या प्रमाणावर ताणले जातात. ज्यामुळे ऑप्टिक नर्व्हवर दबाव वाढून मोतीबिंदूचा धोका वाढतो. त्यामुळे उच्च मायोपियाच्या समस्येने त्रस्त असलेल्या लोकांनी नियमित डोळ्यांची तपासणी करून घ्यावी.

मधुमेह:

रक्तातील साखरेचे प्रमाण वाढल्यानंतर मधुमेह होण्याची शक्यता असते. मधुमेहाने त्रस्त असलेल्या लोकांनी आहारात जास्त साखरेचे सेवन करू नये. यामुळे रक्तातील साखर वाढण्याची शक्यता असते. शरीरात साखरेचे प्रमाण वाढल्यानंतर डोळ्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. शिवाय यामुळे डोळ्यांची दृष्टी सुद्धा जाण्याची शक्यता असते.

टीप - हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

# सैफ अली खानवर प्राणघात हल्ला! घराच्या सुरक्षेसाठी फॉलो करा 'या' टिप्स; चोर घरात घुसूच शकणार नाही

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेता सैफ अली खानवर रात्री २ वाजताच्या सुमारास चाकूने हल्ला करण्यात आला. त्यानंतर उपचारासाठी त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले.घराच्या सुरक्षेसाठी फॉलो करा या सोप्या टिप्स.



बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेता सैफ अली खान त्याच्या अभिनयामुळे सगळीकडे प्रसिद्ध आहे. मात्र आज पहाटे सैफ अली खानवर चाकूने हल्ला करण्यात आला. त्यानंतर त्याला उपचारासाठी मुंबईमधील लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. चोरट्यांकडून झालेल्या हल्ल्यात सैफ अली खान जखमी झाला आहे. मुंबई पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करत पुढील तपासाला सुरुवात केली आहे. सैफ अली खानवर झालेल्या हल्ल्यात तो गंभीररित्या जखमी झाला आहे. तसेच त्यावर रुग्णालयात शस्त्रक्रिया सुरू आहे. मागील काही दिवसांपासून राज्यातील सर्वच भागांमध्ये चोरी आणि हल्ला करण्याची प्रकरणे वाढली आहेत. रात्रीच्या वेळी घरात घुसून चोर घरातील दागिने, पैसे इत्यादी गोष्टी चोरी करून घरातील कोणत्याही व्यक्तीवर हल्ला करून पळ काढत आहेत. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला घराच्या सुरक्षेची कशी काळजी घ्यावी, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. या टिप्स फॉलो करून तुम्ही सुद्धा चोरांपासून तुमच्या घराचा बचाव करू शकता.(फोटो सौजन्य - )

घराच्या सुरक्षेसाठी फॉलो करा 'या' टिप्स:

सेंसर अलार्म:

घराच्या सुरक्षेसाठी घरात सेंसर अलार्म बसवून घेणे आवश्यक आहे. यामुळे घरात चोर किंवा इतर कोणतीही अनोळखी व्यक्ती आल्यास लगेच समजून येईल. सेंसर अलार्म घराच्या सुरक्षेसाठी अतिशय महत्वाचा आहे. यामुळे घरातील महागड्या वस्तू, दागिने इत्यादी गोष्टींची चोरी होणार नाही.

मजबुत लॉक:

बाहेर जाताना किंवा इतर वेळी घरी असल्यानंतर दरवाजा लॉक करून घेणे आवश्यक आहे. अन्यथा घरात चोर किंवा अनोळखी व्यक्ती सहज घुसू शकता. घरातील बाहेरेच्या दरवाजाला किंवा खिडक्यांना मजबूत लॉक बनवून घ्यावे, ज्यामुळे घरात चोरी किंवा इतर धोकादायक घटना घडणार नाहीत. त्यामुळे घरात मेटल किंवा लोखंडाचे लॉक वापरावे.

कॅमेरा:

घराच्या आतील आणि बाहेरच्या सुरक्षेसाठी घरात कॅमेरा बसवून घेणे आवश्यक आहे. कॅमेरा असल्यामुळे घरात कोणतीही अज्ञात व्यक्ती आल्यास लगेच समजून येईल. घरात कॅमेरा लावल्यामुळे चोरांच्या हलचालींवर लक्ष ठेवता येईल.

स्मार्ट लाइट्स वापरा:

घरातील प्रत्येक रूममध्ये स्मार्ट लाइट्स वापर करावा. यामुळे चोर आतमध्ये आल्यानंतर लगेच समजून येईल. घरात किंवा बाहेरच्या भागात अंधार न सोडता तुम्ही घरात घुसलेल्या चोरांवर लक्ष ठेवू शकता. याशिवाय रात्रीच्या वेळी घरात लाईट्स चालू ठेवाव्यात. त्यामुळे चोरांना घरात कोणी तरी आहे असे वाटेल.

# देशमुखांच्या मारेकऱ्यांना लपविणाऱ्यांचाही हिशोब होईल; आरोपी संख्या पन्नासवर जाईल-खा.बजरंग सोनवणे यांची प्रतिक्रिया

केज/प्रतिनिधी –मस्साजोगचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांचा तपास सुरू आहे. दरम्यान, अपहरण करताना स्विफ्ट गाडी कोणाची होती?, मारेकऱ्यांना राहायला कोणी घरं दिली?, या सगळ्या गोष्टी तपासात स्पष्ट होतील. खंडणीमधील जे आरोपी होते ते कोणाच्या घरात होते, त्यांना कोणी गाड्या पुरवल्या हे सगळं समोर येईल आणि त्यांचाही हिशोब होईल. इतकच नाही तर या प्रकरणात आरोपींची संख्या पन्नासवर जाईल, अशी प्रतिक्रिया खा.बजरंग सोनवणे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे. खा.बजरंग सोनावणे यांच्यावर संतोष देशमुख यांच्या खुनाशी संबधित असलेला आरोपी वाल्मिक कराड यांच्या पत्नीने वाल्मिक कराड यांना लोकसभा निवडणूकीनंतर जिवे मारण्याची धमकी दिली होती, असा आरोप केल्यानंतर माध्यमांशी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, उभ्या आयुष्यात मी कधीही कोणाला धमकी दिली नाही. उलट लोकसभा



निवडणूकीचा निकाल सुरू असताना बाहेर मलाच दमदाटी केल्याच्या खबरा पेरल्या गेल्या. त्यात काही लोकांनी स्वतची वाहवाही करून घेतली. मात्र, निकाल सुरू असताना असे काहीही झाले नव्हते. मी त्यावेळी धमकी दिली तर कराडताईंनी त्याच वेळेस का सांगितले नाही. आता सहा महिन्याने काहीही आरोप करण्याचे त्यांचे काम सुरू आहे. त्याबाबत फारसे न बोललेले बरे. दरम्यान, संतोष देशमुख यांचा क्रुरपणे खून करण्यात आला. ही घटना मावतेला काळीमा फासणारी घटना आहे. या प्रकरणाची व्याप्ती मोठी आहे.संतोष देशमुख यांचे अपहरण करताना स्विफ्ट गाडी कोणाची होती? मारेकऱ्यांना राहायला कोणी घरं दिली?, या सगळ्या गोष्टी तपासात स्पष्ट होतील. खंडणीमधील जे आरोपी होते ते कोणाच्या घरात होते, त्यांना कोणी गाड्या पुरवल्या हे सगळं समोर येईल. परळी बाहेरचा विषय खूप मोठा आहे. केजमध्ये गुंडांची प्रवृत्ती झालीय. इतर आरोपींनासुद्धा मकोका लावला पाहिजे ही आमची मागणी आहे. हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टमध्ये चालवायला हवे. ड्व्होकेट उज्वल निकम जर होकार देत नसतील तर सतीश मानेशिंदे या वकील महोदयांना हे प्रकरण द्या, असेही खा.बजरंग सोनावणे यांनी म्हटले.

००

जमावबंदी असताना आंदोलन कसे? बीडमध्ये दि.१४ रोजी रात्री वाजेपासून जमावबंदी आदेश लागू करण्यात आले होते. असे असतानाही परळीत आंदोलन कसे झाले? हिंदू सणाच्या दिवशी गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी परळी बंद करण्याचा निर्णय घेतला. या प्रकरणी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून त्यांना सगळा वृत्तांत देणार आहे.

००

मुंडेच्या राजीनाम्याचा प्रश्न सरकारचा... गुन्हेगाराला कुठलीही जात नसते. काही मूठभर समाजकंटक आहेत, ज्यांना जातीय रंग द्यायचा आहे. अजित पवारांनी बीडमध्ये पक्षाची कारवाई करताना थोडा उशीर केला का काय असं वाटतंय. संतोष देशमुख हत्येच्या संदर्भात जे–जे आहेत, जे कोणी सामील असेल या सर्वांना फाशी झाली पाहिजे. मी मागितला तर धनंजय मुंडे राजीनामा देणार आहेत का? तो सरकारचा प्रश्न आहे ते बघतील, असेही खा.बजरंग सोनावणे यांनी म्हटले आहे.

# सरस्वती महाविद्यालयात विद्यापीठ नाम विस्तार दिन साजरा



केज/प्रतिनिधी–उपेक्षित, वंचित, गरीब, मजूर,शेतकरी यांच्या प्रवाहा बाहेरील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची द्वारे मराठवाड्यासारख्या अविकसित भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिलिंद महाविद्यालयाच्या माध्यमातून खुली केली. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हा नाम विस्तार दलित, उपेक्षित आणि बहुजनांचा विचाराचा विजय असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर यांनी केले. ते सरस्वती महाविद्यालय केज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ विस्तार दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गौतम पाटील हे होते.

अध्यक्ष समारोपप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. पाटील म्हणाले की, विद्यापीठाला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देणे ही फक्त बाबासाहेबांना नव्हे तर विद्यापीठासाठी अत्यंत गौरवाची बाब असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास प्रा.डॉ.आहेर,प्रा. डॉ.चाटे,प्रा. डॉ.शिंदे,प्रा. डॉ. आरडले,प्रा.डॉ.वराळे,प्रा. डॉ. कराळे आदींची होती. सूत्रसंचालन प्रा. डॉ. किरणकुमार धिमधिमे तर आभार प्रा. डॉ. सारिका बुरगे यांनी मानले. यावेळी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# ट्रॅक्टर पलटी होऊन तरुण शेतकरी ठार



किनवट/शेख शौकत

:–चिखली बु. येथिल शेतकरी पेरणी करण्यासाठी ट्रॅक्टर घेऊन शेताकडे जात असतांना भरधाव वेगात असलेल्या ट्रॅक्टरवरचे नियंत्रण सुटल्याने राष्ट्रीय महामार्गावर येताच पलटी होऊन विक्रम लक्ष्मण भगत (वय वर्ष २४) हा पेरणी मशिनखाली येऊन जागीच ठार झाल्याचे दुर्दैवी घटना आज (१६ जानेवारी) सकाळी आठ वाजता घडली. विक्रम भगत हा शेतकरी पेरणी करण्यासाठी सकाळीच शेताकडे पेरणीयंत्र जोडलेले ट्रॅक्टर घेऊन निघाला होता. त्या ट्रॅक्टरचा वेग एवढा होता कि, राष्ट्रीय महामार्गावर येताना वळण रस्त्यावर पलटी झाला. पेरणीयंत्राखाली सापडून विक्रम हा जागीच मृत्यू पावला. १६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी आठ वाजताची घटना आहे. विक्रम एकुलताएक मुलगा असल्याने चिखली गावासह परिसरात आणि प्रत्यक्षदर्शींनी हळहळ व्यक्त केली.

# रेल्वे प्रशासनाच्या विरोधात रिपाई आठवले गट च्या वतीने स्वाक्षरी मोहीम.





नवी मुंबई / के. एच. हनवते:–नवी मुंबई रेल्वे स्थानक आणि परिसरात नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्यामुळे रिपब्लिकन पक्षाच्या वतीने अपंग व ज्येष्ठ नागरिकांकरिता स्वयंचलित पायऱ्या आणि लिफ्टची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन ठाणे पनवेल ठाणे नेरूळ आणि ठाणे वाशी मार्गावर लोकांचा फेऱ्या वाढवण्यात याव्या महिलांवरील वाढणारे अत्याचार लक्षात घेता रात्री प्रवास करणाऱ्या महिलांच्या सुरक्षतेसाठी रेल्वे स्थानकात महिला रेल्वे पोलीस नेमण्यात यावे तसेच पोलिसांची गस्त वाढवण्यात यावी, रेल्वे स्थानकामध्ये सुलभ शौचालय आणि पिण्याच्या पाण्याची दुरावस्था असल्याने हा प्रश्न सोडवावा तसेच प्रत्येक रेल्वे स्थानकाबाहेर दोन्ही बाजूला रेल्वे तिकीट घराचे सुविधा उपलब्ध करून द्यावी यांसह अनेक मागण्यांसाठी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने जिल्हाध्यक्ष महेश खरे यांच्या नेतृत्वाखाली स्वाक्षरी मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. नेरूळ रेल्वे स्थानक येथे जिल्हाध्यक्ष महेश खरे, कार्याध्यक्ष धरमसी पटेल, सरचिटणीस एल. आर. गायकवाड, कोपरखैरणे रेल्वे स्टेशन येथे कार्याध्यक्ष विजय कांबळे, प्रमुख संघटक नारायण मोरे, घणसोली रेल्वे स्थानक येथे नवी मुंबई प्रवक्ते सचिन कटारे, सचिव प्रकाश तुळसे, ऐरोली येथे नवी मुंबई उपाध्यक्ष टिळक जाधव बेलापूर विधानसभा अध्यक्ष महेश कांबळे, बेलापुर रेल्वे स्थानक येथे सुनील रसनभैरे, वाशी रेल्वे स्थानक येथे आयुब खान, जुईनगर येथे घोडके, तुर्भे येथे रमेश जोगदंड, सिवूड्स येथे महेश जंगले, यांसह घणसोली विभाग अध्यक्ष सोमा कांबळे, सरचिटणीस संकेत पवार, मंगेश गायकवाड,लअशोक जाधव, वसंत जाधव, भीमराव तायडे, बालाजी कांबळे, बाबू गायकवाड, मंगेश रणदिवे, अनंत तांबे, अनंत पवार, रवी गायकवाड, सागर कसबे, विनय मसुरकर, धम्मपाल नीखडे, आश्विन कुमार धस्के, प्रकाश सुरवाडे, बाबासाहेब डाके ,चाबुकस्वार, साठे, विजय पगारे, विजय दांडके ,राजू कांबळे आदींसह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.



# नामदेव ढसाळ यांच्या कवितेवर बोलू काही...

मुंबई / के. एच.हनवते:– पद्मश्री, महाकवी, साहित्यिक–नामदेव ढसाळ व शहीद भागवत जाधव यांचे स्मृतिदिनानिमित्त माटुंगा सांस्कृतिक सभागृह दादर पश्चिम मुंबई येथे नामदेव ढसाळ फाउंडेशनच्या वतीने आयोजित नामदेव ढसाळ यांच्या कवितेवर बोलू काही तसेच मृत्यूशयावर लिहिलेल्या अखेरच्या दस्तऐवज या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रमात महेश बनसोडे निर्मित चल हल्लाबोल या चित्रपटाचे उपस्थित प्रमुख पाहुणे समाजभूषण श्री उत्तम दासु तरकसे असरढोहकर (राज्य शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत), डॉ. स्वप्निल ढसाळ (दलित पँथर राष्ट्रीय अध्यक्ष), डॉ. संगीता ढसाळ, संदेशजी उमप (प्रसिद्ध पार्श्वगायक), महेशजी बनसोडे (चित्रपट निर्माते) व इतर मान्यवर तसेच नामदेव ढसाळ यांचे चाहते अनुयायी व रसिक प्रेक्षक यांना चल हल्लाबोल हा चित्रपट दाखवण्यात आल्या नंतर उपस्थित मान्यवरांनी नामदेव ढसाळ यांच्या कवितेचे वाचन केले सदर कार्यक्रमात समाजभूषण श्री उत्तम तरकसे यांनी नामदेव ढसाळ यांची दलित अन्याय अत्याचाराची मालिका खंडित होत नाही.... स्वातंत्र्य नावाची रंडी कधी इथे नांदत नाही.... ही कविता सादर करत उपस्थितामध्ये पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या आठवणींना उजाळा देत आपले मनोगत व्यक्त केले, सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदेशजी उमप यांनी खूप सुंदर प्रकारे सादर केले असून उपस्थितांचे आभार प्रदर्शन डॉक्टर स्वप्नील ढसाळ यांनी करून कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.



# राज्य क्रीडा दिनानिमीत्ताने आयोजीत विविध उपक्रमास खेळाडूंसह जेष्ठांचाही सहभाग




लातूर :– महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेमध्ये क्रीडा वातावरण निर्मीती करण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी स्व.खाशाबाजाधव (कुस्तीचे खेळाडू) यांचा १५ जानेवारी हा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. या अनुषंगाने क्रीडा व खेळाचा प्रचार व प्रसार व्हावा, शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत क्रीडा व खेळाचे महत्व पोहोचविणे, यासाठी लातूर जिल्ह्यामध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. १५ जानेवारी रोजी जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आयोजित विविध उपक्रमाअंतर्गत जिल्हा क्रीडा संकुलामध्ये नियमित सरावासाठी येणाऱ्या खेळाडू , क्रीडाप्रेमी , महिला तसेच जेष्ठ नागरीकांनीही सहभाग नोंदवला. या प्रसंगी राज्य क्रीडा दिनाचे औचित्य साधून सकाळी जिल्हा क्रीडा संकुल येथे रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये कर्मवीर ॲकडमी व कमान्डो ॲकडमीचे खेळाडू, खेलो इंडीया कुस्ती प्रशिक्षण केंद्रातील कुस्तीपटू, तसेच नियमित व्यायाम करणारे नागरीकांनी रॅलीमध्ये उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. रॅलीचा समारोप जिल्हा क्रीडा संकुल येथील खुले प्रेक्षागृह येथे करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा कौशल्य विकास सहाय्यक आयुक्त बालाजी मरे, कृषी अधिक्षक भास्कर कोळेकर, गट विकास अधिकारी (मनरेगा) संताजी माने, प्रभू जाधव, बाभळगाव पोलीस प्रशिक्षण केंद्राचे उपप्राचार्य वसंत चव्हाण, से.नि.पोलीस उपनिरीक्षक गौतम कांबळे, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड, राज्य क्रीडा मार्गदर्शक जयराज मुंढे, क्रीडा अधिकारी चंद्रकांत लोदगेकर, कृष्णा केंद्रे, धिरज बावणे, बाबासाहेब इंगोले हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे यांनी केले, तर आभार जयराज मुंढे यांनी मानले. तसेच सायंकाळी जिल्ह्यातील विविध खेळाचे अंतरराष्ट्रीय , राष्ट्रीय खेळाडू, उत्कृष्ट मार्गदर्शक यांचा राज्य क्रीडा दिनानिमीत्ताने सन्मान करण्यात आला. याप्रसंगी खेलो इंडीया कुस्ती केंद्र येथील खेळाडूंनी आणि जिम्नॅस्टीकच्या खेळाडूंनी प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी विभागीय कामगार आयुक्त मंगेश झोले यांच्या हस्ते सर्व आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळाडू, उत्कृष्ट मार्गदर्शक यांना स्व.खाशाबा जाधव यांची प्रतिमा व जीवन चरित्रावर आधारित ग्रंथ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

# शिवजागृतीचे रासेयो शिबिर विविध उपक्रमांनी संपन्न

नळेगाव : शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक २१ ते २७ डिसेंबर २०२४ या कालावधीत मौजे शिवणखेड ता.चाकूर जि. लातूर येथे ' युथ फार माय भारत अँड युथ फॉर डिजिटल लिटरसी' हे विशेष शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन लातूर येथील जयक्रांती महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.श्रीधर कोल्हे यांच्या हस्ते संपन्न झाले. या रासेयो शिबिरात स्वयंसेवकाच्या मार्फत शिवणखेड (बु.) या गावातील ग्रामस्वच्छता,आरोग्याविषयी जाणीवजागृती कार्यक्रम, साक्षरता अभियान, रक्तक्षय व इतर चाचण्या व मार्गदर्शनासाठी आरोग्य शिबिर, स्वयंसेवकांसाठी प्रेरणादायी प्रश्नमंजुषा स्पर्धा, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचे उपक्रम, त्याबरोबरच ग्रामस्थांच्या प्रबोधनासाठी विविध प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात आले. स्वयंसेवकांच्या प्रबोधनासाठीसुद्धा अनेक विषयांवर तज्ज्ञ प्राध्यापक व अभ्यासकांची बौद्धिके घेण्यात आली. या सर्व बौद्धिक उपक्रमाबरोबरच, प्राणायाम, योगासने आणि विपश्यना यांविषयी मार्गदर्शन व सराव वर्ग घेण्यात आले.याप्रसंगी या शिबिराच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय वाघमारे यांनी मार्गदर्शन केले. तर वरिष्ठ महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. अरविंद कदम, कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. निळकंठ बोळेगावे,सहकार्यक्रमाधिकारीप्रा. गोविंद आदावळे, डॉ.ओमशिवा लिगाडे,डॉ. अमोल पगार, डॉ.लहू वाघमारे आणि प्रा.राहुलदेव कदम, श्री ऋषीकेश शिरूरे ,पवन तेलंग,बबीता राठोड यांनी परिश्रम घेतले.




# लाडक्या बहिणीचा हप्ता २६ जानेवारीपूर्वी

मुंबई : लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर येत असून जानेवारी महिन्याचा हफ्ता मिळण्याची तारीख समोर आली आहे. लाडक्या बहिणींना २६ जानेवारीच्या आधीच या महिन्याचा हफ्ता मिळणार असल्याचे राज्याच्या मंत्री आदिती तटकरे यांनी जाहीर केले आहे.

या संबंधी माहिती देताना आदिती तटकरे म्हणाल्या की, २६ जानेवारीच्या आधी जानेवारी महिन्याचा लाभ मिळेल असा प्रयत्न सुरू आहे. यासाठी ३,६९० कोटींचा निधी आम्हाला मिळणार आहे. अर्थसंकल्पाच्यावेळी देखील महिलांना लाभ कसा मिळेल याची तरतूद आम्ही करणार आहोत.

आदिती तटकरे म्हणाल्या की, आम्ही फेब्रुवारीचे नियोजन सुद्धा करत आहोत. लाडकी बहीण योजनेचा लाभ आम्ही २ कोटी ४६ लाख महिलांना दिला. काही महिलांबाबत तक्रार आली होती. ड्युप्लिकेशन झालेल्या केसेस कमी होत्या. त्यामुळे फार काही फरक पडेल असे मला वाटत नाही. थोड्याफार कमी होतील.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE